# माजी मंत्री सुभाष देशमुख यांनी घेतली वाघ कुटुंबीयांची भेट

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ यांचे गेल्या महिन्यात निधन झाले. त्या अनुषंगाने मंगळवारी (दि.२२) मुंबई येथील निवासस्थानी राज्याचे माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी बाळासाहेब देवराम वाघ यांचे चिरंजीव समीर वाघ, स्नुषा निवेदिता वाघ, नातू श्रीवर्धन वाघ आणि यशवर्धन वाघ यांची भेट घेत कुटुंबाचे सांत्वन केले. सुभाष देशमुख यांनी बाळासाहेब वाघ उर्फ भाऊंच्या आठवणींना उजाळा दिला व त्यांना आदरांजली अर्पण केली.

**26-03-2022**

**Gavakari**

# माजी मंत्र्यांकडून वाघ कुटुंबीयांचे सांत्वन

**नाशिक ।** के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे गेल्या महिन्यात निधन झाले. त्या पार्श्वभूमीवर मुंबई येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख यांनी बाळासाहेबांचे चिरंजीव समीर वाघ, निवेदिता वाघ, श्रीवर्धन वाघ आणि यशवर्धन वाघ यांची भेट घेत कुटुंबीयांचे सांत्वन केले. देशमुख यांनी यावेळी बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा देत आदरांजली अर्पण केली.

**26-03-2022**

**Deshdoot**

# माजी मंत्री सुभाष देशमुखांची वाघ कुटुंबियाची भेट

नाशिक । कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कै. बाळासाहेब देवराम वाघ यांचे गेल्या महिन्यांत दु:खद निधन झाले. त्याअनुषंगाने मंगळवारी (दि.२२) मुंबई येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्याचे माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी कै. बाळासाहेब देवराम वाघ



यांचे चिरंजीव तथा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्नुषा निवेदिता वाघ, नातू श्रीवर्धन वाघ आणि यशवर्धन वाघ यांची भेट घेत कुटूंबाचे सांत्वन केले. सुभाष देशमुख यांनी बाळासाहेब वाघ उर्फ भाऊंच्या आठवणींना उजाळा दिला. त्यांना आदरांजली अर्पण केली.

Nashik Edition
Mar 25, 2022 Page No.
Powered by : eReleGo.com

## वाघ अभियांत्रिकीत परदेशी भाषा शिकण्याची संधी

**नाशिक :** वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच नवनवीन उपक्रम राबविले जातात. या अनुषंगाने महाविद्यालयाकडून ऑगस्ट २०२१ पासून परदेशी भाषा शिकण्यासाठी रोसेटा स्टोन, कॉम्प्युटर एसेस्टेड लँग्वेज लर्निंग (कॉल) हे व्यासपीठ विद्यार्थ्यांसाठी अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले आहे. या अंतर्गत रोसेटा स्टोनमार्फत २५ विविध परदेशी भाषांचे ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण घेता येते. हा उपक्रम सुरू करण्यासाठी संस्थेचे दिवंगत अध्यक्ष स्व. बाळासाहेब वाघ यांनी विशेष प्रयत्न केले. महाविद्यालयात रोसेटा स्टोनद्वारे ५७ विद्यार्थ्यांनी जर्मन, १८ विद्यार्थ्यांनी इंग्रजी, १२ विद्यार्थ्यांनी जपानी, १२ विद्यार्थ्यांनी फ्रेंच आणि एका विद्यार्थ्याने स्पॅनिश भाषेचे प्रशिक्षण घेतले. या १०० विद्यार्थ्यांपैकी कु. प्रणिता सोनवणे, कु. जागृती सूर्यवंशी, कु. अनघा कुलकर्णी, कु. आचल झंझोटे, कु. शिल्पा सहारे आणि कु. रोहित फुलझेले यांनी सर्वोत्तम गुण प्राप्त केले. या विद्यार्थ्यांचा प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर, डीन प्रा. डॉ. प्रीती भामरे व प्रा. सुरुची मालव यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

**21-03-2022,**

**Gavakari**

# के. के. वाघ संस्थेतर्फे ४५ महिलांचा सत्कार

**नाशिक** | के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे स्व. बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महिला दिनाचे औचित्य साधत सरस्वतीनगर येथील कॉलेज व डीजीपीनगर कॅम्पस येथे स्वच्छतेचे काम करणाऱ्या ४५ महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुणे संस्थेच्या विश्वस्त तथा आयटी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रीती भामरे यांच्या हस्ते उपस्थित महिलांचा सत्कार व त्यांच्या सेवेचे कौतुक केले. मानसशास्त्रीय सल्लागार डॉ. प्रतिभा चांडक यांनी मानसिक आरोग्याबद्दल तर ॲड. श्रद्धा कुलथे यांनी महिला कायद्यांबाबत मार्गदर्शन केले. प्रा. प्रिया रकिबे यांनी कै. बाळासाहेब वाघ यांनी महिला सबलीकरणासाठी केलेले कार्य याबद्दल मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. दीप्ती नाखले यांनी केले. पूजा दिवटे यांनी आभार मानले.

पुढारी

## संक्षिप्त

# डॉ. के. एन. नांदूरकर यांची फेरनिवड

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षणसंस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर यांची भारतीय उद्योग महासंघ अर्थात सीआयआयच्या महाराष्ट्र शाखेच्या उद्योग-शिक्षण मंचाच्या सहसंयोजकपदी फेरनिवड करण्यात आली आहे. उद्योग शिक्षण मंचच्या मुख्य संयोजिका गीतिका कांबळी आणि डॉ. नांदूरकर यांच्या प्रयत्नातून उद्योग व्यवसाय व शिक्षणसंस्था यांच्यातील संबंध वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असा आशावाद भारतीय उद्योग महासंघाच्या महाराष्ट्र शाखेचे नवनिर्वाचित चेअरमन श्रीराम नारायण यांनी व्यक्त केला.



आपलं महानगर



# परदेशी भाषेत वाघ अभियांत्रिकीचे यश

**नाशिक ।** अभियांत्रिकी अभ्यासक्रमासोबतच परदेशी भाषा शिकण्याची संधी कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयांत ऑगस्ट २०२१ पासून परदेशी भाषा शिकण्यासाठी 'रोसेटा स्टोन', कॉम्प्युटर एसेस्टेड लँग्वेज लर्निंग (कॉल) हे व्यासपीठ विद्यार्थ्यांनसाठी उपलब्ध आहे. या अंतर्गत रोसेटा स्टोन मार्फत २५ विविध परदेशी भाषांचे ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण घेता येते. महाविद्यालयात रोसेटा स्टोनद्वारे ५७ विद्यार्थ्यांनी जर्मन, १८ विद्यार्थ्यांनी इंग्रजी, १२ विद्यार्थ्यांनी जपानी, १२ विद्यार्थ्यांनी फ्रेंच आणि १ विद्यार्थ्याने स्पॅनिश भाषेचे प्रशिक्षण घेतले. या १०० विद्यार्थ्यांनं पैकी सोनवणे प्रणिता, जागृती सूर्यवंशी, अनघा कुलकर्णी, आचल झंझोटे, शिल्पा सहारे आणि रोहित फुलझेले यांनी सर्वोत्तम गुण प्राप्त केले. या विद्यार्थ्यांचा प्राचार्य प्रा. डॉ. केशव नांदुरकर, डीन प्रा. डॉ. प्रीती भामरे व रोसेटा स्टोन समन्वयक प्रा. सुरुची मालव यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. या बद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांच्यासह विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोक मर्चन्ट आणि सचिव प्रा. के. एस. बंदी, यांनी अभिनंदन केले.

Nashik Edition
Mar 19, 2022 Page No.
Powered by : eReleGo.com

## वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात मार्गदर्शन

पंचवटी : मुलींना असमानतेमुळे बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते. समाजात लिंगभाव संवेदनशीलता रुजविणे ही काळाची गरज आहे. यासाठी घरात पालकांनी, तर शाळा- महाविद्यालयात शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. ज्या वेळी मुलींना असुरक्षित वाटेल. त्या वेळी त्यांनी कोणताही विचार न करता नजीकच्या. पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. तक्रार मिळाल्यानंतर पोलिस विभागामार्फत तातडीने त्यावर कार्यवाही केली जाईल, असे आवाहन पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले यांनी केले. महिला दिनानिमित्त के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयातील एमबीए विभागातर्फे लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्रभारी कुलसचिव डॉ. अजिंक्य जोशी, एमबीए विभागाच्या प्रभारी विभागप्रमुख डॉ. सरोज ढाके उपस्थित होते. डॉ. सरोज ढाके यांनी स्वागतपर भाषणात एमबीए विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी संस्थेबद्दल माहिती देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वतेबद्दल संस्थेचे विश्वस्त समीर वाघ, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, अजिंक्य वाघ , सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी अभिनंदन केले.

**18-03-2022,**

**sakal**

लोकमत

## के. के. वाघमध्ये महिलांचा सत्कार

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे स्व. बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ महिलादिनाचे औचित्य साधत संस्थेत स्वच्छतेचे काम करणाऱ्या ४५ महिलांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या विश्वस्त तथा आयटी विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रीती भामरे यांच्या हस्ते महिलांना सन्मानित करण्यात आले. यानंतर डॉ. प्रतिभा चांडक यांनी 'मानसिक आरोग्य' तर ॲड. श्रद्धा कुलथे यांनी महिलांच्या कायद्यांची माहिती दिली. कार्यक्रमास माहेश्वरी पाटील, प्रियंका वाळके, स्नेहल मटकर, प्रतीक्षा गायकवाड, मेघाराणी भोईटे, सुजाता कदम, ऋतुजा पाटील, जागृती ठाकरे, प्रा. दीप्ती नाखले, पूजा दिवटे उपस्थित होत्या.

Hello Nashik
Page No. 8 Mar 18, 2022
Powered by: erelego.com

पुढारी




नाशिक : महिलांचा सत्कार करताना के. के. वाघ संस्थेचा प्राध्यापकवर्ग.

# वाघ शिक्षणसंस्थेतर्फे ४५ महिलांचा सत्कार

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षणसंस्थेतर्फे स्व. बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व महिलादिनाचे औचित्य साधून अभियांत्रिकी कॅम्पस, सरस्वतीनगर कॅम्पस व डीजीपीनगर कॅम्पस येथे ४५ महिला सफाई कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या विश्वस्त तथा आयटी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रीती भामरे यांच्या हस्ते या महिलांना पुष्पगुच्छ व भेटवस्तू देण्यात आल्या. त्यानंतर मानसशास्त्रीय सल्लागार डॉ. प्रतिभा चांडक यांनी 'मानसिक आरोग्य' याबद्दल तर अॅड. श्रद्धा कुलथे यांनी महिलांसाठी असलेले विशेष कायदे याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. प्रिया रकिबे, प्रा. दीप्ती नाखले, माहेश्वरी पाटील, प्रियंका बाळके, स्नेहल मटकर, प्रतीक्षा गायकवाड, मेघाराणी भोईटे, सुजाता कदम, ऋतुजा पाटील आणि जागृती ठाकरे आदी उपस्थित होते.

My Nashik Edition
Mar 19, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# वाघ शिक्षण संस्थेतर्फे महिलांचा गौरव

**पंचवटी :** के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे (स्व.) बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रित्यर्थ महिलादिनाचे औचित्य साधत संस्थेअंतर्गत अभियांत्रिकी कॅम्पस, सरस्वतीनगर कॅम्पस व डीजीपीनगर कॅम्पस येथे साफसफाईच्या माध्यमांतून सेवा बजावत असलेल्या ४५ महिला कर्मचाऱ्यांच्या विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या विश्वस्त तथा आयटी विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रीती भामरे यांच्या हस्ते उपस्थित महिलांचा सत्कार झाला. यानंतर मानसशास्त्रीय सल्लागार डॉ. प्रतिभा चांडक यांनी मानसिक आरोग्याबद्दल, तर ॲड. श्रद्धा कुलथे यांनी महिलांसाठी असलेले विशेष कायदे बाबत मार्गदर्शन केले. तसेच प्रा. प्रिया रकिबे यांनी (कै.) बाळासाहेब वाघ यांनी महिला सबलीकरणासाठी केलेले कार्य व विविध क्षेत्रातील महिलांचे योगदान याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. दीप्ती नाखले यांनी केले. आभार पूजा दिवटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी माहेश्वरी पाटील, प्रियांका वाळके, स्नेहल मटकर, प्रतिक्षा गायकवाड, मेघाराणी भोईटे, सुजाता कदम, ऋतुजा पाटील आणि जागृती ठाकरे या मध्यवर्ती कार्यालयातील सर्व महिला कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# वाघ शिक्षण संस्थेकडून महिलांचा सत्कार

**नाशिक । दि. १८ प्रतिनिधी**



के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे स्व. बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संस्थेअंतर्गत अभियांत्रिकी कॅम्पस, सरस्वतीनगर कॅम्पस व डीजीपीनगर कॅम्पस येथे साफसफाईच्या माध्यमांतून सेवा बजावत असलेल्या ४५ महिला कर्मचाऱ्यांच्या पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन विशेष सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या विश्वस्त तथा आय.टी विभागाच्या विभागप्रमुख प्रा.डॉ.प्रीती भामरे यांच्या हस्ते उपस्थित महिलांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मानसशास्त्रीय सल्लागार डॉ. प्रतिभा चांडक यांनी मानसिक आरोग्याबद्दल तर अँड.श्रद्धा कुलथे यांनी महिलांसाठी असलेले विशेष कायदे बाबत मार्गदर्शन केले.

प्रा. प्रिया रकिबे यांनी बाळासाहेब वाघ यांनी महिला सबलीकरणासाठी केलेले कार्य व विविध क्षेत्रातील महिलांचे योगदान याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीप्ती नाखले तर पूजा दिवटे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी माहेश्वरी पाटील, प्रियंका वाळके, स्नेहल मटकर, प्रतिक्षा गायकवाड, मेघाराणी भोईटे, सुजाता कदम, ऋतुजा पाटील आणि जागृती ठाकरे यांचे सहकार्य लाभले.

## भाजप जैन प्र

# डॉ. नांदूरकर यांची सहसंयोजकपदी फेरनिवड

**पंचवटी :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर यांची भारतीय उद्योग महासंघाच्या महाराष्ट्र शाखेच्या उद्योग-शिक्षण मंचाच्या सहसंयोजकपदी फेरनिवड करण्यात आली आहे. भारतीय उद्योग महासंघ ही १८९५ साली स्थापित, दिल्लीस्थित, बिगर शासकीय अग्रगण्य संस्था आहे. या महासंघामार्फत भारतीय उद्योगांचे प्रश्न सोडविण्यास तसेच शासनाला औद्योगिक धोरण ठरविण्यास मोलाचे सहकार्य लाभते. या अंतर्गत गेल्या वर्षी उद्योग-शिक्षणमंचाच्या सहसंयोजकपदी प्रा. डॉ के. एन. नांदूरकर यांची निवड केली गेली होती. त्यांच्या मागील वर्षाच्या कामगिरीच्या धर्तीवर यंदादेखील भारतीय उद्योग महासंघाने त्यांची फेरनिवड केली आहे. उद्योग शिक्षण मंचच्या मुख्य संयोजक गीतिका कांबळी आणि डॉ. नांदूरकर यांच्या प्रयत्नातून उद्योग व्यवसाय व शिक्षण संस्था यांच्यातील संबंध वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असा आशावाद भारतीय उद्योग महासंघाच्या महाराष्ट्र शाखेचे नवनिर्वाचित चेअरमन श्रीराम नारायण यांनी व्यक्त केला. त्यांच्या या बहुमानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. तसेच संस्थेचे विश्वस्त चांगदेवराव होळकर, अशोकभाई मर्चंट आणि सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी निवडीबद्दल आनंद व्यक्त केला आहे.



प्रा. नांदूरकर

पुढारी

# समाजात लिंगभाव संवेदनशीलता रुजवणे गरजेचे

## चौगुले-श्रींगी : वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात मार्गदर्शन

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

मुलींना असमानतेमुळे बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते. समाजात लिंगभाव संवेदनशीलता रुजवणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी घरात पालकांनी तर शाळा-महाविद्यालयात शिक्षकांनी तसेच विद्यार्थ्यांनी सजग राहावे. मुलींना असुरक्षित वाटल्यास तत्काळ नजीकच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. तक्रार मिळाल्यानंतर पोलिस विभागामार्फत तातडीने त्यावर कार्यवाही केली जाईल, असे पोलिस उपआयुक्त पौर्णिमा चौगुले यांनी सांगितले.



**नाशिक : के. के. वाघ महाविद्यालयातील कार्यक्रमात बोलताना पोलिस उपआयुक्त पौर्णिमा चौगुले-श्रींगी. समवेत मान्यवर.**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयातील एमबीए विभागातर्फे 'लिंगभाव संवेदनशीलता' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्रभारी कुलसचिव डॉ. अजिंक्य जोशी, एमबीए विभागाच्या प्रभारी विभागप्रमुख डॉ. सरोज ढाके आदी उपस्थित होते. डॉ. सरोज ढाके यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी संस्थेची सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांना विविध विषयांचे धडे दिले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे विश्वस्त समीर वाघ, अशोक मर्चंट, चांगदेव होळकर, अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी आदींचे मार्गदर्शन लाभले.

Nashik Edition
Mar 14, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in



# समाजात लिंगभाव संवेदनशीलता रुजवणे गरजेचे : पौर्णिमा चौगुले

**नाशिक : प्रतिनिधी**

मुलींना असमानतेमुळे बऱ्याच समस्यांना सामोरे जावे लागते. समाजात लिंगभाव संवेदनशीलता रुजवणे ही काळाची गरज आहे, यासाठी घरात पालकांनी तर शाळा-महाविद्यालयात शिक्षकांनी तसेच विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. ज्या वेळी मुलींना असुरक्षित वाटेल त्यावेळी त्यांनी कोणताही विचार न करता जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपायुक्त पौर्णिमा चौगुले यांनी केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयातील एमबीए विभागातर्फे बुधवार, ९ मार्च २०२२ रोजी लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर मार्गदर्शन करत होत्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्रभारी कुलसचिव डॉ. अजिंक्य जोशी, एम.बी.ए. विभागाच्या प्रभारी विभागप्रमुख डॉ. सरोज हाके उपस्थित होते. डॉ. सरोज हाके यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी संस्थेबद्दल माहिती देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे विश्वस्त समीर वाघ, अशोकभाई मर्चंट, चांगदेवराव होळकर, अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी कौतुक केले.

**14-03-2022**

**Gavakari**

# प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर पुन्हा उद्योग महासंघाच्या सहसंयोजकपदी

**नाशिक - प्रतिनिधी**



येथील नामांकित के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर यांची भारतीय उद्योग महासंघाच्या (CII) महाराष्ट्र शाखेच्या उद्योग-शिक्षण मंचाच्या सहसंयोजकपदी फेरनिवड करण्यात आली आहे.

भारतीय उद्योग महासंघ ही १८९५ साली स्थापित, दिल्लीस्थित, बिगर शासकीय संस्था आहे. या अंतर्गत गेल्या वर्षी उद्योग-शिक्षणमंचाच्या सहसंयोजक पदी प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर यांची निवड केली गेली होती. उद्योग शिक्षण मंचच्या मुख्य संयोजक गीतिका कांबळी आणि डॉ. नांदूरकर यांच्या प्रयत्नातून उद्योग वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असा आशावाद भारतीय उद्योग महासंघाच्या महाराष्ट्र शाखेचे नवनिर्वाचित चेअरमन श्रीराम नारायण यांनी व्यक्त केला. प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या नेतृत्वात के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग (यू.जी.सी.), नवी दिल्ली यांच्यातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ते २०३१-३२ या दहा वर्षांकरिता 'ऑटोनॉमस' अर्थात 'स्वायत्त' महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग व्यवसाय आणि शिक्षण क्षेत्रात नवनवीन प्रयोगांच्या माध्यमातून इंडस्ट्री रेडी विद्यार्थी व उद्योग संस्था व विद्यार्थी यांचा संवाद वाढण्यास नक्कीच मदत होईल, असा विश्वास व्यक्त करत त्यांच्या या बहुमानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. तसेच संस्थेचे विश्वस्त मा. चांगदेवराव होळकर, अशोकभाई मर्चंट आणि सचिव मा. प्रा. के. एस. बंदी यांनी या सर्व निवडीबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**14-03-2022,**

**Gavakari**

# वाघ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी 'इंडस्ट्री रेडीनेस' कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

पंचवटी, ता. १२ : तंत्रशिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व ओळखून शिक्षणक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी कौशल्य वाढीसाठी प्लेसमेंट विभागामार्फत प्रथम ते अंतिम वर्षापर्यंत विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये सीव्ही रायटिंग, ॲप्टिट्यूड मॉक टेस्ट, मॉक मुलाखत, सीईओ कनेक्ट यांचा समावेश आहे.

या वर्षी रमा प्रसाद गोएंका समूहाकडून झेन्सार टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून तिसऱ्या वर्षाच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. आरपीजी फाउंडेशनने प्रथम कॉम्प्युटर आणि आयटीच्या तिसऱ्या वर्षाच्या १५० विद्यार्थ्यांची ऑनलाइन टेस्ट घेतली. त्यानंतर ४५ विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी निवड केली. हे प्रशिक्षण ४ टप्प्यांमध्ये पार पडले. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात प्रोग्रॅमिंग आणि सॉफ्ट स्किलसचे ५२ तासाचे, दुसऱ्या टप्प्यात ॲप्टिट्यूड टेस्ट आणि लिडरशीप प्रशिक्षण ५२ तासाचे, तिसऱ्या टप्प्यात मुलाखत कशी द्यावी, मुलाखतीची तयारी कशी करावी याचे ४३ तासांचे आणि शेवटच्या टप्प्यात इंडस्ट्री लाइव्ह प्रोजेक्टकवर काम करण्याची संधी देण्यात आली. त्यावर ४३ तासांचे प्रशिक्षण देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या ट्रेनिंगच्या दृष्टीने संस्थेने आरपीजी फाउंडेशनसोबत सामंज्यस करार केला आहे. ट्रेनिंगचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी आणि त्यांना इंडस्ट्रीमध्ये जाण्यासाठी तयार करणे हा होता. विद्यार्थ्यांना कंपन्यांच्या निवड प्रक्रियेसाठी अत्यंत फायदा झाला, असे मत नामांकित कंपन्यांमध्ये नेमणूक मिळालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले. प्रशिक्षण घेतलेल्या ४५ विद्यार्थ्यांपैकी ४१ व विद्यार्थ्यांची नामवंत कंपन्यांमध्ये निवड झाली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँन्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाबद्दल संस्थेचे विश्वस्त समीर वाघ, चांगदेवराव होळकर, अशोक मर्चंट, सचिव मा. प्रा. के. एस. बंदी यांनी अभिनंदन केले.



# K. K. Wagh Education Society

Central Office : Hirabai Haridas Vidayanagari, Amrutdham, Panchavati, Nashik - 03, Ph. No. (0253) 2221106, 2221109, 2221111

Email Id : disp-co@kkwagh.edu.in Website : www.kkwagh.edu.in






## ।। वैशिष्ट्ये ।।

- गेली ५० वर्षे गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी संस्था. के. जी. पासून पीएच.डी.पर्यंत विविध शाखांमध्ये शिक्षणाची सोय.
- अभियांत्रिकी महाविद्यालयातील नऊ (९) शाखांना व तंत्रनिकेतनच्या चार (४) शाखांना NBA कडून मानांकन प्राप्त.
- अभियांत्रिकी महाविद्यालयास NAAC द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त.
- रोजगार व उच्च शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणारी संस्था.
- राष्ट्रीय स्तरावरील AICTE- CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास ४ वेळा 'Platinum Category' (सर्वोत्कृष्ट दर्जा) प्राप्त.
- ६ विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी संस्था.
- अभिजात भारतीय कला जोपासणारी - 'ललित कला व प्रयोगजीवी कला शिक्षण' महाविद्यालये.
- विद्यार्थी विकास केंद्रीत शिक्षणावर भर देणारी संस्था.
- AICTE - Idea Lab साठी अनुदान मिळवणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय.
- सन २०२२-२३ पासून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) नवी दिल्लीकडून अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्राप्त.

### नवीन विद्याशाखा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून परवानगी

- अभियांत्रिकी महाविद्यालयाअंतर्गत Computer Science & Design
- तंत्रनिकेतन अंतर्गत Artificial Intelligence & Machine Learning
- औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, नाशिक अंतर्गत Diploma in Pharmacy के. के. वाघ ललित कला महाविद्यालय, नाशिक अंतर्गत BVA (Painting & Sculpture)

।। शुभेच्छुक ।।

**श्री. समीर वाघ, अध्यक्ष**

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवृंद व विद्यार्थी

**Constituents of K. K. Wagh Education Society**

| | | |
|---|---|---|
| Engineering | Agriculture & Allied Colleges | Schools (CBSE) |
| MBA / MCA | Pharmacy (B. Pharm. & D.Pharm) | Schools (SSC) |
| Polytechnic | B.Ed./Nursing | Schools (Marathi Medium) |
| Arts, Commerce & Science Colleges | Fine Arts/ Performing Arts | Well Equipped Boys & Girls Hostels |